:: **<u>प्रेस नोट</u>** :: दिनांक :- १४/११/२०२६

अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमास ०२ अग्निशस्त्रे व १९ जिवंत काडतुसासह गुन्हे शाखेकडून अटक

दि. १४/११/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराचे मार्फतीने माहिती मिळाली की, के.के. मार्ग, आग्रीपाडा, मुंबई येथे एका ठिकाणी काही इसम कोणताही परवाना नसताना अवैधरित्या अग्निशस्त्र सदृश वस्तू व जिवंत काडतुसे घेवून येणार आहेत.

त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ कार्यालयाचे पोलीस पथकाने आज रोजी सापळा लावून के.के. मार्ग, आग्रीपाडा, मुंबई येथे एका ठिकाणी संशयास्पद हालचाली करणाऱ्या इसमास ताब्यात घेतले असता त्याचेजवळ ०२ देशी बनावटीची पिस्टल व १९ जिवंत काडतुसे मिळून आली. त्याचे विरुध्द आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२, मुंबई कार्यालयाचे मार्फतीने करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. कृष्ण कांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहायक पोलीस आयुक्त, डी-दक्षिण श्री. पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ येथील प्रभारी पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप तेजनकर, पोनि सुहास माने, पोउपनि अजीम शेख, पोउपनिचा घाटोळ, सफौ सावंत, पोह परब, पोशि जाधवर, पोशि आव्हाड यांनी केलेली आहे.